# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भातकुली (जि.अमरावती) येथे ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीबाबत**

**(१) १६०६८ (०९-०४-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातुकली (जि.अमरावती) येथे ग्रामीण रुग्णालयाची इमारत पुर्णत्वास आली असून तेथे लवकरच रुग्णालय सुरु करण्यासाठी पुरेसा कर्मचारी मंजुर करुन तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र, गणोरी येथे स्थलांतरीत करण्यासाठी जिल्हा प्रशासन जागा उपलब्ध करुन देण्यास विलंब करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन व जिल्हा परीषद प्रशासन भातकुली ग्रामीण रुग्णालय सुरु करुन तसेच तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र गणोरी येथे स्थलांतरीत करण्यासाठी पुरेसी जागा (जमिन) व बांधकामासाठी निधी कधी पर्यंत मंजुर करणार आहे याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

भातकुली ग्रामीण रूग्णालय, अमरावती येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून सदरची इमारत दि. ०५.०३.२०१५ रोजी ताब्यात घेण्यात आलेली आहे. सदर रूग्णालयातील आवश्यक सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच गणोरी, ता.भातुकली येथे प्राथमिक आरोग्य केंद्रांकरीता योग्य जागा उपलब्ध करून घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(२) ग्रामीण रूग्णालय भातकुलीकरीता साहित्य सामुग्री उपकरणे खरेदी करण्याकरीता दि. २४.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून खरेदीची कार्यवाही सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, गणोरी करीता जागा उपलब्ध झाल्यानंतर निधी मंजूर करण्यात येईल.

---

**तेरखेडा (ता.जि.उस्मानाबाद) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीस मंजूरी न मिळाल्याबाबत.**

**(२) २०१८६ (१७-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेरखेडा (ता.जि.उस्मानाबाद) या राष्ट्रीय महामार्गावरील गावासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूरी मिळावी म्हणून तेथील ग्रामस्थांनी मागील सुमारे ५ वर्षापासून मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा शल्यचिकित्सक, उस्मानाबाद आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीसाठी परिसरातील ३० हजार लोकसंख्येची अट असून तेरखेडा या गावांची लोकसंख्या १३ हजारांच्या घरात असून सटवाईवाडी, खामकरवाडी, कडकनाथवाडी, रत्नापूर, बावी, मसोबाचीवाडी, नांदगाव, खानापूर, बोरी, इसरूप, गोजवडा ही गावे तेरखेडापासून जवळच असून तेरखेडा व अन्य सदर गावांची लोकसंख्या ही ३० हजारांहून अधिक असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३० हजारांची अट पूर्ण करु शकतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापी तेरखेडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणीस मंजूरी न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राअभावी तेरखेडा व परिसरातील गोर-गरीब रुग्णांना नाहक आरोग्य सेवेपासून वंचित व्हावे लागत औषधोपचारासाठी आर्थिक भार तसेच अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, तेरखेडा येथे प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या उभारणीस शासनाची मंजूरी होवून सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्र लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

मोजे तेरखेडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद येथे प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजूरी मिळावी म्हणून तेथील ग्रामस्थांनी जिल्हा शल्यचिकित्सक, उस्मानाबाद यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(२) होय हे खरे आहे.

मौजे तेरखेडा, ता. वाशी हे गाव ३० हजार लोकसंख्येची अट पूर्ण करू शकते.

(३) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१२/ प्र.क्र.१४१/ आरोग्य-३, दि.१७.०१.२०१३ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र तेरखेडा, ता.वाशी, जि.उस्मानाबाद या आरोग्य संस्थेस मंजूरी देण्यात आली आहे. तथापि तांत्रिक त्रुटींमुळे अ.क्र.६३ येथे तेरखेडा ऐवजी तेरडा हे नाव शासन निर्णयात प्रसिद्ध गेले आहे. सबब दि. १५.०१.२०१८ च्या शासन शुद्धीपत्रकाद्वारे सदर त्रुटी दुरूस्त करण्यात आली आहे.

(४) नाही. हे खरे नाही.

सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केद्र येरमाळा हे तेरखेडा गावापासून ७ किमी अंतरावर आहे. तसेच तेरखेडा येथे आयुर्वेदीक दवाखना व आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहे. त्यामुळे तेरखेडा रीसरातील रूग्णांना नियमित आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

(५) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामास जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सुरू असून जागा उपलब्ध होताच इमारतीच्या बांधकाम सुरू करण्यात येईल.

---

**राज्यातील रुग्णालयात रुग्णांसाठी एस.एम.एस.व्दारे बेड आरक्षित करण्याबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३) २८७३६ (२१-०१-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णालयात रुग्णांसाठी एस.एम.एस.व्दारे कोणत्या रुग्णालयात किती खाटा रिकाम्या आहेत व सदर खाटा आरक्षित करण्याची सुविधा रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना उपलब्ध करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व खाजगी रुग्णालयांचा यात समावेश केला आहे काय,

(३) असल्यास, सदर सुविधेच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया तालुक्यात मरामटोला (काटी) कटंगटोला, सिरपूर, लहिटोला येथे उपलब्ध जागेवर आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत**

**(४) ३७८५३ (२१-०१-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात ६ प्राथमिक आरोग्य केंद्र, २२ प्राथमिक आरोग्य उप केंद्र मंजूर असून केवळ खमारी प्राथमिक आरोग्य केंद्र व चार प्राथमिक आरोग्य उप केंद्र कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया तालुक्यात मरामटोला (काटी) कटंगटोला, सिरपूर, लहिटोला येथे उपलब्ध जागेवर आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी सन २०१४ मध्ये आदेश निर्गमीत केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यरत आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक पद निर्मिती व पद भरती न केल्याने तसेच उपलब्ध कर्मचा-याना वेळेवर वेतन मिळत नसल्यामुळे परिणामत: स्थानिक सर्वसामान्य जनतेलाच अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, गोंदिया तालुकयातील मंजूर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत तसेच कार्यरत आरोग्य केंद्र, आरोग्य उप केंद्राकरीता आवश्यक पदनिर्मिती व तदभरती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यात एकूण ७ प्राथमिक आरोग्य केंद्र व २९ उपकेंद्रे मंजूर आहेत. मंजूर प्राथमिक आरोय केंद्रांपैकी खमारी व खोडशिवनी ही दोन प्राथमिक आरोय केंद्र कार्यरत आहेत. तसेच २९ उपकेंद्रांपैकी १२ उपकेंद्रे कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी येथे ७ तांत्रिक पदे भरण्यात आलेली आहेत व ८ अतांत्रिक पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र खोडशिवनी येथील सर्व पदे भरलेली आहे. ज्या आरोग्य संस्थांना पदे मंजूर करण्यात आलेली आहेत त्या सर्व ठिकाणी नियमित कर्मचा-यांना बदलीद्वारे किंवा कंत्राटी आरोग्य सेविकेद्वारे आरोग्य सेवा पुरविण्यात येते. तसेच जिल्ह्यातील सर्व नियमित व कंत्राटी कर्मचा-यांना दरमहा नियमित वेतन अदा करण्यात येते.

(४) बृहत आराखड्यानुसार गोंदिया तालुक्याकरीता मंजूर प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी येथे ८ तांत्रिक पदे भरली असून उर्वरीत ७ अतांत्रिक पदे बाह्य यंत्रणेमार्फ़त भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच मंजूर ८ उपकेंद्रांपैकी महालगाव (मुरदडा), कासा, कुडवा व तेढवा ही ४ उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.मरारटोला, शिरपूर, लहिटोला व कटंगटोला या उर्वरीत ४ उपकेंद्रांचे बांधकाम पूर्ण झाले असून पदनिर्मितीची कार्यवाही सुरू आहे.

---

## शेलू बाजार (ता.मंगळरुपीर, जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत

**(५) ३९४१२ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलू बाजार (ता.मंगळरुपीर, जि.वाशिम) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाच्या दर्जा देणेबाबत मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने तेथील परिसर लोकसंख्या तेथील स्थानिक परिस्थितीची पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला काय,

(३) असल्यास या प्रकरणी पुन्हा दर्जा वाढीचे आदेश दिले असल्यास त्या आदेशांचा क्रमांक काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून वाशिम जिल्ह्यातील शेलू बाजार येथे ग्रामीण रूग्णालय सुरू करण्याची मागणी जोड- बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा (जि.भंडारा) येथे महिला रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६) ४५१५८ (११-०५-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा (जि.भंडारा) येथे महिला रुग्णालय सुरु करण्यासाठी जी शासकीय दुध संकलन केंद्राची जागा निश्चित करण्यात आली होती ती जागा नेस्ले कंपनीला देण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या महिला रुग्णालयासाठी कोणती जागा निश्चित करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा स्त्री रूग्णालय, भंडारा करीता मौजे भंडारा नझूल त.सा.क्र. १६ शित क्र. ५४ न.भु.क्र.१६,१७,२०/१,२०/४ शित क्र. ५७ न. भु.क्र. ३/१,३/२, ४ मधील १०,५०० चौ. मी. जागा उपलब्ध झाली असून सदर जागा जिल्हा शल्य चिकित्सक, भंडारा यांच्या नावाने हस्तांतरीत झालेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उंबरे (ता.राहूरी, जि.नगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अपूरे कर्मचारी व सोयी सुविधाअभावी झालेली दुरावस्था**

**(७) ४९७२० (११-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.नगर) तालुक्यातील १३ गावांतील ७० हजार ग्रामस्थांसाठी कोटयावधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले उंबरे प्राथमिक आरोग्य केंद्राची कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे व सोयी सुविधांचा अभाव असल्यामुळे दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरील प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरावस्था दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरे येथे एकूण मंजूर १३ पदांपैकी ११ पदे भरलेली आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फ़त तातडीच्या वैद्यकीय सेवांची उपलब्धता, प्रसूती, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, बाह्यरूग्ण कक्ष, ६ खाटांचे आतंररूग्ण कक्ष, प्रयोगशाळा सेवा, इ.सेवांसह रूग्णांवर उपचार केले जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रतापपूर (ता.तळोदा, जि.नंदुरबार) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची सुरक्षा भिंत कोसळून दोन बालकांचा मृत्यू व एक जखमी झाल्याबाबत**

**(८) ५३९३२ (३०-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रतापपूर (ता.तळोदा, जि.नंदूरबार) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची सुरक्षा भिंत कोसळल्याने दोन बालकांचा मृत्यू व एक बालक जखमी झाल्याने माहे मे २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षा भिंती खाली आलेले प्रवीण मोरे व संगीता मोरे उपचाराकरीता नेत असतांना मृत पावले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राथमिक केंद्राच्या दुरूस्तीकरीता तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी आरोग्य विभागाकडे अनेकदा प्रस्ताव पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, मृत पावलेल्या बालकांच्या पालकांना व व जखमी झालेल्या बालकास शासनाने आर्थिक मदत केली आहे काय,
(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे काय, नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
प्राथमिक आरोग्य केंद्र प्रतापपूर, ता.तळोदा ची ईशान्य पूर्व भागातील संरक्षक भिंत दि.२१.०५.२०१६ रोजी सकाळी ८.४५ वाजता कोसळली. सदर भिंतीजवळ खेळत असलेली ३ बालके भिंतीखाली दबली गेल्यामुळे त्यातील दोन बालके मृत्यू पावली व एक बालक जखमी झाले.
(२) अंश:त खरे आहे.

प्रविण दिलीप ठाकरे ( वय २ वर्षे ११ महिने) याचा डोक्याला मार लागल्याने जागीच मृत्यू झाला. संगिता दिलीप ठाकरे (वय ७ वर्षे ११ महिने) हिला उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालयातून जिल्हा रूग्णालयात नेत असताना मृत्यू झाला.

(३) हे खरे नाही.

(४) मृत मुलांची आई श्रीमती यमुना ठाकरे यांच्या बँक खात्यात राजीव गांधी अपघात विमा योजनेंतर्गत रू. ७५,०००/- इतकी रक्कम दि. १८.०८.२०१७ रोजी जमा करण्यात आली.

(५) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र प्रतापपूर येथील संरक्षक भिंतीचे बांधकाम सन १९९५ पूर्वी झालेले असून आवार भिंत जीर्ण झालेली आहे. आवार भिंतीचा पाया दगडी बांधकामात असून सद्यस्थितीत पायाचे दगड निखळल्याने पाया कमकुवत झालेले आहे. ज्या ठिकाणी अपघात झाला तेथील पायाचे दगड काढून ग्रामस्थांनी वापरासाठी बोगदा केला होता. तसेच अपघाता दिवशी वादळी वारे असल्याने सदर अपघात झाला. सदर संरक्षक भिंतीची दुरूस्ती करण्यात आली आहे.

---

## रिसोड (जि.वाशिम) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुतीगृह सुरु ठेवण्याच्या मागणीबाबत

**(९) ५५३७९ (३०-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) रिसोड (जि.वाशिम) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र सन १९७७ मध्ये भोप येथे जाऊन शहरापासून तीन कि.मी. अंतरावर ग्रामीण रुग्णालयात स्थापित झाले त्यामुळे जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राची ब्रिटीशकालीन भव्य वास्तू, प्रशस्त आवार, करोडोची मालमत्ता सध्या अखरेच्या घटका मोजत असल्याने येथे प्रसूतीगृह रहावे अशी जनतेची मागणी असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन जनतेच्या केलेल्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

रिसोड, जि.वाशिम येथे नगरपरिषद क्षेत्र आहे. या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय मंजूर झाल्यामुळे तेथील प्रा.आ.केंद्र हे त्याच तालुक्यातील मौजे भोप येथे स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. तसेच रिसोड येथे नवीन जागेत ग्रामीण रूग्णालय बांधण्यात आले असून ते कार्यान्वित आहे. मूळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ब्रिटिशकालीन वास्तूमध्ये सध्या तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व डॉट सेंटर कार्यान्वित आहे. त्या ठिकाणी प्रसूतीगृह राहावे अशी मागणी प्राप्त झाली नाही.

(२) रिसोड येथील ग्रामीण रुग्णालय कार्यान्वीत असल्यामुळे त्या ठिकाणी दुसरे नवीन प्रसुतीगृह मंजूर नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुधारणा करण्याबाबत**

**(१०) ६३८५६ (३०-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील देव्हाडी, गोबरवाही, नाकाडोंगरी, चुल्हाड, लेंडेझरी, सिहोरा, करडी, जांब, मुंडीकोटा (त.तिरोडा ) या प्राथमिक आरोग्य केंद्रातील अपुरी व्यवस्थेमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याने तेथील रुग्णांना प्रसूतिकरिता/उपचाराकरिता सुभाषचंद्र बोस उपजिल्हा रुग्णालय, तुमसर येथे जावे लागत असल्याने उपजिल्हा रुग्णालयातील भार कमी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २३ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांना मुख्यालयात राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय प्रसूतींचा आढावा घेऊन कमी प्रसूती असणा-या प्राथमिक आरोग्य केंद्रांना संस्थात्मक प्रसूतीच्या प्रमाणात वाढ करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार (जि. बुलढाणा ) येथील ग्रामीण रुग्णालयात सुविधा मिळत नसल्याबाबत**

**(११) ६६५८९ (१०-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना कोणत्याच सोयीसुविधा मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) अंश:त खरे आहे.
लोणार येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये डॉक्टरांच्या एकूण ५ पदांपैकी ४ पदे रिक्त असून कर्मचा-यांच्या २२ पदांपैकी ९ पदे भरली आहेत व त्यांच्यामार्फ़त रूग्णसेवा देण्यात येत आहेत.
(२) व (३) रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सोपवून रूग्णांना उपचार सेवा देण्यात येत आहेत. वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) तालुक्यात मानव विकास योजनेंतर्गत रावणगाव, किनी, रायखोड येथील तीन प्रसुती कक्ष कार्यान्वित करण्याबाबत**

**(१२) ६८१५० (२७-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यात मानव विकास योजनेंतर्गत रावणगाव, किनी, रायखोड येथील तीन प्रसुती कक्ष अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी निधी उपलब्ध करुन सदर कक्ष त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
भोकर तालुक्यातील उपकेंद्र रावणगाव येथील प्रसूतीकक्ष कार्यान्वित आहे. उपकेंद्र रायखोड येथील प्रसुती कक्षाचे बांधकाम गावाजवळील जागेत पूर्ण झाले आहे. उपकेंद्र किनी येथील प्रसुतीकक्षाचे बांधकाम कंत्राटदाराने पूर्ण न करताच सोडून दिल्याने त्या बांधकामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही. बांधकाम पुर्ण करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयात सर्पदंशने एका रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(१३) ६८४८० (१०-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयात सर्पदंश झालेल्या व्यक्तीवर अंधश्रेध्देद्वारे उपचार केल्यामुळे रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषी असणाऱ्या रुग्णालयातील कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील संदर्भ सेवा रुग्णालयात रेडिओथेरपी यंत्रणा बंद असल्याबाबत**

**(१४) ७८०८७ (१५-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील संदर्भ सेवा रुग्णालयातील रेडीओथेरपीची यंत्रसामुग्री बंद असल्याबाबत माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, सदरची यंत्रणा बंद असल्यामुळे रुग्णांची उपचाराअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, बंद यंत्रसामुग्रीची दुरुस्ती आणि पॉवर ऑडीट करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) दि. ०२.१२.२०१६ ते दि. ०६.०३.२०१७ या कालावधीत विभागीय संदर्भ सेवा रूग्णालय, नाशिक येथील रेडिओथेरपी युनिटमधील लिनिअर ॲक्सिलेटर संयत्रामधील स्पेअर पार्ट निकामी झाल्यामुळे सदरचे संयंत्र बंद होते.

मे. सिमेन्स लि. मुंबई यांनी दि. ०६.०३.२०१७ रोजी सदरचे संयंत्र दुरूस्त करून दिले होते. तथापि रेडिओथेरपी युनिटमधील ए.सी. नादुरूस्त असल्याने मे. सिमेन्स लि., मुंबई यांनी लिनिअर ॲक्सिलेटर संयंत्र ए.सी. चालू झाल्यानंतरच वापरावे असे दि. ०६.०३.२०१७ च्या तांत्रिक अहवालात नमूद केले होते. सबब रेडिओथेरपी विभागातील ए.सी. दि. २८.०३.२०१७ रोजी दुरूस्त झाल्यानंतर दि. ३०.०३.२०१७ रोजीपासून सदर संयंत्र चालू करण्यात आले आहे.
सार्वजनिक बांधकाम विभाग ( विद्युत) यांनी रूग्णालयात असलेली किंमती यंत्रसामुग्री ही

कमी जास्त विद्युत पुरवठा झाल्यास खराब होऊ नये यासाठी सबस्टेशन, रेडिओथेरपी मशिनचे मेन पॅनेल, मेन कंट्रोल पॅनेल, ट्रान्सफॉर्मर, जनरेटर इ. ठिकाणची सक्षम आर्थिंग नव्याने करून जोडणी करून दिली आहे. रेडिओथेरपी मशिनला स्वतत्र युपीएस मार्फ़त पुरवठा करण्यात आलेला आहे. दि. ३०.०३.२०१७ पासून लिनियर ॲक्सलेरेटर संयंत्र सुस्थितीत वापरात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड (जि. यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकाम प्रस्तावाबाबत**

**(१५) ७८६१४ (१८-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि. यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचा प्रस्ताव निधीच्या मान्यतेसाठी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात निवेदनाद्वारे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) उमरखेड( जि. यवतमाळ) येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या बांधकामास सन २०१७-१८मध्ये एकूण १.५० कोटी व सन २०१८-१९ मध्ये एकूण ३.५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

---

**अचलपूर (जि. अमरावती) रुग्णालयास जिल्हा सामान्य रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत**

**(१६) ८११७२ (१५-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि. अमरावती) रुग्णालयाचा दर्जा वाढवून जिल्हा सामान्य रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उपजिल्हा रूग्णालय, अचलपूर जि. अमरावती रूग्णालयाचा १०० खाटांवरून २०० खाटांचे सामान्य रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्यास दि. ०७.०९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोणार (जि. बुलढाणा) ग्रामीण रुग्ग्णालयातील गैरप्रकार

**(१७) ८७८९० (१९-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) ग्रामीण रुग्णालयात सलाइनच्या बाटल्या स्नानगृहात टाकण्यात आल्याचा प्रकार माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच या रुग्णालयात क्ष-किरण कक्षासह विविध कक्ष बंद असतात, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
रिकाम्या सलाईनच्या बाटल्या विल्हेवाट लावण्यापूर्वी काही काळ जमा करून स्नानगृहात ठेवल्या होत्या
(२) क्ष- किरण तज्ञाचे पद रिक्त असल्याने जवळच्या रूग्णालयातील क्ष- किरण तज्ञाची सेवा आठवड्यातून ३ दिवसांसाठी तात्पुरत्या स्वरूपात प्रतिनियुक्तीने देण्यात आली आहे. सदर क्ष-किरण तज्ञाच्या प्रसूती रजेच्या कालावधीत क्ष किरण कक्ष बंद होता. सध्या सदर क्ष - किरण तज्ञांच्या सेवा आठवड्यातून ३ दिवस सुरू आहेत. इतर कक्ष हे बाह्यरूग्ण वेळेत आणि आपत्कालीन कालावधीत सुरू असतात.
(३) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, लोणार यांनी केलेल्या चौकशीत रिकाम्या झालेल्या सलाईनच्या बाटल्या दुपार पाळीतील कक्ष स्वच्छतेसाठी जैविक घनकचरा अंतर्गत विल्हेवाट लावण्यासाठी एकत्रित जमा करून स्नानगृहात तात्पुरत्या ठेवण्यात आल्या होत्या. नंतर त्याची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली.
(४) कोणत्याही प्रकारचा जैविक घनकचरा हा स्नानगृह वा इतर कोणत्याही कक्षामध्ये ठेवण्यात येऊ नये याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील आर्णी पंचायत समिती अंतर्गत मौजे सावळी सदोबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरप्रकार**

**(१८) ८८६५१ (१९-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील आर्णी पंचायत समिती अंतर्गत मौजे सावळी सदोबा प्राथमिक आरोग्य केंद्रात गैरप्रकार सुरू असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर अनेक महिन्यांपासून नसून अनेक जागा रिक्त आहेत तसेच औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त जागा भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अर्णी पंचायत समितींतर्गत मौजे सावळी सदोबा प्राथमिक आरोग्य केंद्रात गैरप्रकार सुरू असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) अंशत: खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र सावळी येथे मंजूर दोन वैद्यकीय अधिका-यांच्या पदांपैकी एक पद रिक्त आहे. उर्वरीत पदावरील कार्यरत महिला वैद्यकीय अधिकारी प्रसूती रजेवर गेल्या आहेत. सद्यस्थितीत येथे आयुर्वेदीक दवाखाना कवठाबाजार येथील महिला वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. वैद्यकीय अधिकारी, आयुर्वेदिक दवाखाना भानसरा यांना तेथे आठवड्यातून तीन दिवस कामकाज पाहण्याकरीता आदेशित करण्यात आले आहे. त्यामुळे रूग्णांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात येतात.

प्राथमिक आरोग्य केंद्र सावळी येथे जिल्हास्तरावरून वेळोवेळी औषधपुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त वैद्यकीय अधिकारी, गट क व गट ड पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि. नाशिक) येथे बांधण्यात आलेली ट्रामा केअर सेंटरची इमारत विनावापर पडून असल्याबाबत**

**(१९) ९११०३ (१९-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि. नाशिक) येथे बांधण्यात आलेली ट्रामा केअर सेंटरची इमारत गेल्या तीन वर्षापासून उदघाटनाअभावी विनावापर पडून असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारतीचा ताबा शासकीय रुग्णालय प्रशासनाला अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
मालेगांव, जि. नाशिक येथे २०० खाटांचे सामान्य रूग्णालय दि. ३०.०६.२००९ पासून कार्यान्वित झाले आहे. सदर रूग्णालयामध्ये एक कक्ष ट्रामा केअर युनिट साठी मंजूर असून ते सामान्य रूग्णालयासोबतच कार्यान्वित झाले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मनमाड (जि.नाशिक) येथे उपजिल्हा रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबत**

**(२०) ९१२०६ (२३-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सुमारे १ लक्षपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मनमाड उपजिल्हा रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरु करणेबाबत शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून उप जिल्हा रूग्णालय मनमाड येथे ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्याची मागणी जोड बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळणेबाबत**

**(२१) ९२३६१ (१९-०८-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळणेबाबतचा प्रस्ताव मागील ७ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यप्रदेशच्या सीमेपर्यंतचा विस्तार व त्यातील दुर्गम व आदिवासी भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यास शासन प्रयत्नशील आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून रावेर, जि. जळगाव येथील ग्रामीण रूग्णालयाचे उपजिल्हा रूग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी जोड बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली सामान्य रुग्णालयात स्वतंत्र बर्न वॉर्ड नसल्यामुळे जळीत महिला व पुरुषांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२२) ९२४४५ (१९-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली सामान्य रुग्णालयात स्वतंत्र बर्न वॉर्ड नसल्यामुळे जळीत महिला व पुरुषांची गैरसोय होत असून शिवाय अत्यावश्यक सुविधा नसल्यामुळे रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य रुग्णालय हिंगोली या रुग्णालयाच्या नविन इमारतीची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा रुग्णालय हिंगोलीच्या अतिरिक्त १०० खाटांच्या इमारतीचे बांधकाम प्रगती पथावर आहे. सदर इमारतीचे बांधकाम अधिक गतीने पूर्ण करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

**देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील यंत्र सामुग्री विनावापर पडून असल्याबाबत**

**(२३) ९८२०१ (२७-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या लाखो रुपयांची यंत्र सामुग्री विनावापर पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) ग्रामीण रूग्णालय व ट्रामा केअर सेंटर देऊळगाव राजा येथे एप्रिल, २०१६ पासून निकषानुसार सर्व उपकरणे, साधन सामुग्री व सुविधा उपलब्ध असून कार्यान्वित आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे दर्जी बोरगाव (ता.रेणापूर, जि. लातूर) येथील आयुर्वेदिक रुग्णालयास इमारत बांधकामासाठी निधी मंजुरीबाबत**

**(२४) ९८५९१ (२७-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दर्जी बोरगाव (ता.रेणापूर, जि. लातूर) येथील आयुर्वेदिक रुग्णालयाची इमारत जीर्ण झाल्यामुळे सदर रुग्णालयाची नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सदस्यांनी मा.पालकमंत्री लातूर यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर नवीन इमारतीच्या बांधकामासाठी किती निधीची आवशकता असून निधी मंजुरीबाबत व इमारत बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
मौजे दर्जी बोरगांव, ता.रेणापूर, जि.लातूर येथील आयुर्वेदिक रुग्णालयाची इमारत जीर्ण झाली आहे. सदर जीर्ण इमारत पाडून नवीन इमारत बांधण्याबाबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि.२१.०७.२०१७ रोजी मान्यता देण्यात आली आहे.
(२) दर्जी बोरगाव येथील आयुर्वेदिक रुग्णालयाच्या जीर्ण इमारत बांधकामाकरीता रु.१२०.०० लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून सदर बांधकामाकरीता सन २०१८-१९ च्या जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत आयुर्वेदिक व युनानी दवाखान्याचे बांधकाम करणे या योजनेंतर्गत रु.१२०.०० लक्ष इतक्या निधीची मागणी करण्यात आली आहे.
(३) आवश्यक निधी प्राप्त होताच इमारतीचे बांधकाम करण्यात येईल.

---

**नाशिक शहरात स्वतंत्र महिला रुग्णालयास मंजूरी देण्याबाबत**

**(२५) ९८७७९ (२७-१२-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात १०० खाटांच्या स्वतंत्र महिला रुग्णालयास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) अदयाप कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहेत,?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाशिक शहरातील १०० खाटांच्या स्त्री रूग्णालयाकरीता दि. २८.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये रू. २४१७.८२ लक्ष इतक्या निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि जागा उपलब्ध नसल्याने इमारतीचे बांधकाम होऊ शकले नाही. जागा उपलब्ध करून देण्यासंदर्भात आयुक्त, नाशिक मनपा यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे.

---

**पाटणबोरी (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२६) ९९००६ (२७-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटणबोरी (ता.केळापूर, जि. यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या रुग्णालय परिसरात कचऱ्याचे प्रमाण वाढले असून कम्पाऊंडच्या आत अस्वच्छता आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, पिण्याचे स्वच्छ पाणी नसून रुग्णांना झोपण्याकरीता व सलाईन लावण्याकरीता खाटा नाहीत तसेच औषधांचा तुटवडा आहे, हे ही खरे आहे का

(४) असल्यास, सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रास तातडीने सर्व साधनसामुग्री उपलब्ध करून देऊन अधिकारी - कर्मचारी नियुक्त करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशःत खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मध्यवस्तीत असून परिसराच्या संरक्षक भिंतीच्या आसपास लोकवस्ती असल्याने संरक्षक भिंतीच्या बाहेरून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरामध्ये कचरा टाकल्यामुळे कधीकधी अस्वच्छता दिसून येते. याबाबत ग्रामपंचायतीला तोंडी व लेखी तक्रार केली आहे.

(३) व (४) प्राथमिक आरोग्य केंद्र, पाटणबोरी येथील परीसरात बोरवेल कार्यान्वित असून त्याद्वारे रूग्णांकरीता पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. रुग्णांकरीता एकूण १८ खाटांची सोय आहे, आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध आहे. तसेच जिल्हा स्तरावरून नियमित औषधांचा पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत वैद्यकिय अधिकारी, गट-अ यांची दोन्ही पदे भरण्यात आली असून कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील दिव्यांगांची त्यांच्या दिव्यांगाबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठीची तपासणी जिल्हा उप रुग्णालयात करण्याबाबत**

**(२७) ९९०९३ (०३-०१-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दिव्यांगांना त्यांच्या दिव्यांगाबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठीची तपासणी दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा उप रूग्णालयात करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा उप रूग्णालयाप्रमाणे ग्रामीण रूग्णालयामध्ये सुध्दा महिन्यातून एकदा दिव्यांगांची तपासणी करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ग्रामीण रूग्णालयास दिव्यांगत्व संबधातील विशेष तज्ञांची पदे मंजूर नसल्यामुळे ग्रामीण रूग्णालयात अपंगत्वाचे प्रमाण देणे शक्य नाही.

केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील दिव्यांगत्वाचे २१ प्रकारानुसार दिव्यांगत्व प्रमाण निश्चीत करण्याच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शिकेच्या अनुषंगाने दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सुचना बाबत शासन निर्णय दिनांक १४.०९.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर शासन निणर्यातील तरतूदीनुसार दिव्यांगत्व प्रमाणपत्र दिव्यांग व्यक्ती ज्या जिल्ह्यातील रहीवाशी आहे त्या जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालय/ वैद्यकीय महाविद्यालय/ उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामीण रूग्णालय यांचेमार्फत देण्यात येणार आहेत, मात्र दिव्यांगत्व प्रमाणपत्र (तज्ञांच्या अभावी) त्या जिल्ह्यात उपलब्ध होणार नसेल तर जवळच्या जिल्ह्यातील शासकीय रूग्णालय/ वैद्यकीय महाविद्यालय/ महानगर पालिका वैद्यकीय महाविद्यालय /रूग्णालय यामधून देण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे शहरातील जुने सर्वोपचार शासकीय रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत**

**(२८) १०५५९४ (०७-०४-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील जुने सर्वोपचार शासकीय रुग्णालय बंद अवस्थेत पडले असून सदर रुग्णालयाच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या लेखापरीक्षणानुसार २ ते ३ कोटी रुपयाच्या निधीची आवश्यकता असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय रुग्णालय तात्काळ सुरु करण्यासाठी व शासनाने सदर कामासाठी लागणारा निधी तात्काळ मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) अंशःतः खरे आहे.

जुने सर्वोपचार शासकीय रूग्णालय पूर्णपणे बंद नसून बाह्यरूग्ण कक्ष व २० खाटा कार्यान्वित आहेत.

(२) जिल्हा रुग्णालय धुळे साठी एकूण २१० पदे व स्त्री रुग्णालयासाठी एकूण ९७ पदे निर्मितीस दि. ०२.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली असून पदभरतीची

कार्यवाही सुरू आहे. धुळे येथील जिल्हा शासकीय रूग्णालयाच्या दुरूस्तीकरीता रू. २ कोटी ०५ लाख ९३ हजार इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दि.२६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आली असून कामे सुरू झाली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे-घोडबंदर जंक्शन येथील उल्हासनदीच्या खाडीवर बांधण्यात येणाऱ्या चार पदरी पुलाच्या प्रस्तावाबाबत**

**(२९) १०५९७५ (३१-०३-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-घोडबंदर जंक्शन येथील उल्हासनदीच्या खाडीवर बांधण्यात येणाऱ्या चार पदरी पुलासाठी ०.५५२५ हेक्टर एवढी कांदळवन जमीन लागणार असल्याचा प्रस्ताव मुख्य वन संरक्षकांनी केंद्रीय अधिकाऱ्यांकडे मान्यतेसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्रीय वन अधिकऱ्यांनी मंजूरी दिली आहे काय,
(३) असल्यास, उक्त चार पदरी पुलाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-११-२०१८) :** (१) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), सुरत (गुजरात) यांचेकडून प्राप्त झालेला राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील ठाणे-घोडबंदर जंक्शन येथील उल्हास नदीच्या खाडीवर चारपदरी पूल बांधणेकरीता पालघर व ठाणे जिल्ह्यातील ०.५५२५ हेक्टर कांदळवन क्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक १७/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर केला होता.
(२) सदर प्रकरणी केंद्र शासनाने दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये काही अटींच्या अधीन राहून अंतिम मान्यता प्रदान केली आहे.
(३) प्रकल्प यंत्रणेने कांदळवनाच्या तोडीकरीता मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळवल्यानंतर नियमानुसार कामे सुरु करण्यास (Working Permission) वन विभागाकडून परवानगी देण्यात येईल.

---

**मौ.कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत**

**(३०) १०५९९० (३१-०३-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली त्यानुसार उपलब्ध जागेवर श्रेणीवर्धीत १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु असून आराखडे व अंदाजित खर्च शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, १०० खाटांचे रुग्णालया कार्यान्वित होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दि.९.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर यांचेस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजे राजुर (ता. अकोले, जि. अहमदनगर) येथे ट्रामा युनिट सेंटर सुरु करण्याची मागणी**

**(३१) १०७०९० (०७-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजुर (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथे ट्रामा युनिट सेंटर सुरु करण्याची मागणी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड-बृहत आराखडा तयार करण्यात येत असून अहमदनगर जिल्ह्यातील मौजे राजुर येथे ट्रामा केअर युनिट सुरू करण्याची मागणी जोड-बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवतनाही.

---

**राज्यात शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय सेवा, चाचण्या, उपचार आणि शस्त्रक्रियांच्या शुल्कामध्ये ११ हजारांपर्यंत वाढ करण्यात आल्याबाबत**

**(३२) १०८५३० (३१-०३-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय रुग्णालयांमधील सर्वसामान्य व गरीब रुग्णांची वैद्यकीय सेवा, चाचण्या, उपचार आणि शस्त्रक्रियांच्या शुल्कामध्ये ११ हजारांपर्यंत वाढविण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय सेवा शुल्कात वाढ करण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहे

(३) असल्यास, केलेले शुल्कवाढ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवतनाही.

(३) प्रश्न उद्भवतनाही.

(४) प्रश्न उद्भवतनाही.

---

**कोल्हापूर शहरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाने स्वतंत्र जिल्हा रुग्णालय जागेच्या प्रस्तावाबाबत**

**(३३) १०८७३५ (३१-०३-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (सी.पी.आर) प्रशासनाकडून महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागाकडे स्वतंत्र जिल्हा रुग्णालयासाठी दिलेला जागेचा प्रस्ताव अद्यापपर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजुरीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

कोल्हापूर येथे १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधणेकरीता जागा उपलब्ध झालेली नाही.

(२) १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय बांधणेकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांनी दि.०८.१२.२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जि.कोल्हापूर यांना प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नांदेड) प्राथमिक आरोग्य केंद्राची झालेली दुरवस्था**

**(३४) १०९१७४ (०५-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नांदेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाण्याची टंचाई असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राथमिक आरोग्य केंद्रात पिण्यासाठी सुध्दा पाणी मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र मालेगांव येथे एक बोअर घेण्यात आली आहे. सदरील बोअर पासून पाईप लाईन करुन रुग्णांकरीता पिण्याच्या पाण्याची व वापराच्या पाण्याची व्यवस्था करुन देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली शहरातील स्त्री रुग्णालयाच्या लोकार्पणाबाबत**

**(३५) १०९३३८ (३१-०३-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली शहरात मध्यभागी स्त्री रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होऊन माहे जानेवारी २०१५ पर्यंत या रुग्णालयाचे लोकार्पण होणार होते परंतु अद्यापपर्यंत लोकार्पण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे जिल्हा रुग्णालयावर अतिरिक्त ताण पडत असल्याने स्त्री रुग्णालया अभावी महिला रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

१०० खाटांच्या स्त्री रूग्णालय गडचिरोलीचे दि. १५.०४.२०१८ रोजी लोकार्पण करण्यात आले असून सदर रूग्णालय त्या दिनांकापासून कार्यरत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपंग व्यक्तींना अपंगाचे प्रमाणपत्र ऑनलाईन व जिल्हयाच्या ठिकाणी मिळण्याबाबत

**(३६) १०९५७८ (१७-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग व्यक्तींना अपंगाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मुंबईतील महालक्ष्मी येथे अलियावर जंग येथे यावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अपंगाचे प्रमाणपत्र ऑनलाईन व जिल्हयाच्या ठिकाणी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२२-११-२०१८) :** (१) व (२) केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील दिव्यांगत्वाचे २१ प्रकारानुसार दिव्यांगत्व प्रमाण निश्चीत करण्याच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शिकेच्या अनुषंगाने दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठीच्या मार्गदर्शक सुचना बाबत शासन निर्णय दिनांक १४.०९.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर शासन निणर्यातील तरतूदीनुसार दिव्यांगत्व प्रमाणपत्र दिव्यांग व्यक्ती ज्या जिल्ह्यातील रहीवाशी आहे त्या जिल्ह्यातील जिल्हा रूग्णालय/वैद्यकीय महाविद्यालय/उपजिल्हा/ग्रामीण रूग्णालय यांचेमार्फत देण्यात येईल, मात्र दिव्यांगत्व प्रमाणपत्र (तज्ञांच्या अभावी) त्या जिल्ह्यात उपलब्ध होणार नसेल तर जवळच्या जिल्ह्यातील शासकीय रूग्णालय/ उपजिल्हा /ग्रामीण रूग्णालय/ वैद्यकीय महाविद्यालय/महानगर पालिका वैद्यकीय महाविद्यालय /रूग्णालय यामधून देण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात लोकसंख्येच्या तुलनेत शासकीय आरोग्यसेवा अपुरी पडत असल्याबाबत**

**(३७) ११०७४९ (०१-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयात लोकसंख्येच्या तुलनेत शासकीय आरोग्यसेवा अपुरी पडत असल्याने प्रशासनाने तेथे ७ वाढीव प्राथमिक आरोग्य केंद्र, ३३ आरोग्य उपकेंद्राचा प्रस्ताव शासनाने अदयाप मंजूरी दिली नसल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, येथील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी या प्रस्तावाला शासनाने तातडीने मान्यता देवून येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) अंशःत खरे आहे.
(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड बृहत आराखडा तयार करण्यात येत असून वाशिम जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा व आरोग्य केंद्रांचा बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रूग्णालयातील तपासणीकरिता असलेल्या शुल्कांमधील दरवाढ कमी करण्याबाबत**

**(३८) १११८५१ (१०-०४-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये औषधोपचारासाठी व दाखल होणाऱ्या रुग्णांकडून केसपेपर पासून सर्वच तपासण्याकरीता असलेल्या शुल्कांमध्ये शासनाने वाढ केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रुग्णालयातून विविध उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांकडून व अपंग रुग्णांकडून वाढीव शुल्क आकारणी करु नये यासाठी सोलापूर जिल्ह्यातील संभाजी आरमारच्या वतीने शुल्कवाढीचा निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करुन शुल्कवाढ रद्द करावी अशी मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय रुग्णालयातून अपंगाकरीता देण्यात येणारे प्रमाणपत्र यापूर्वी निशुल्क असतांना त्यावर ५० रुपये शुल्काची आकारणी व नोकरीकरीता प्रमाणपत्र हे असल्यास ५०० रुपये अपंगांना शुल्क लावण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आरोग्य विभागाने केलेली शुल्कवाढ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय रुग्णालयाच्या खासगीकरणासाठी नेमण्यात आलेल्या समितीबाबत

**(३९) १११९०३ (०६-०४-२०१८). श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णांना व नागरीकांना रुग्णालयातून अत्याधुनिक वैद्यकीय सेवा सुविधा मिळावी यासाठी ३०० खाटांची शासकीय रुग्णालये पब्लीक प्रायव्हेट पार्टरशीप (पीपीपी) मॉडेलनुसार चालविण्याचा प्रस्तावासाठी दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीचे स्वरुप काय असून समितीच्या कार्यकक्षा आणि समितीस कोणकोणते अधिकार देण्यात आलेले आहेत,

(३) तसेच, खाजगीकरणामुळे सामान्य नागरिकांना स्वस्त रुग्णसेवा मिळणे अशक्य होणार असल्यामुळे हा निर्णय रद्द करावा याबाबतची मागणी जन आंदोलने करुन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या दि.२९.१२.२०१५ च्या अधिसूचनेतील मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील ३०० खाटांची रूग्णालये व त्यांतर्गत संलग्नित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करून PPP तत्वावर चालविण्याकरीता खाजगी संस्थेस देण्याबाबत शासनाचे धोरण निश्चिती करण्याकरीता आयुक्त ( आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, रा. आ. अ., मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव वैद्यकीय महाविद्यालय वसतीगृहाच्या खोलीत विजेचा शॉक लागून अपघाती मृत्यूबाबत**

**(४०) ११२३६१ (१०-०४-२०१८). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात इंटर्नशिप करणाऱ्या डॉ. प्रशांत राठोड यांचा दिनांक २८ मे, २०१७ रोजी वसतिगृहाच्या खोलीत विजेचा शॉक लागून अपघाती मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी क्राईम ब्रँच तर्फे चौकशी करून वैद्यकीय महाविद्यालयाच्या दोषी व्यवस्थापनाविरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केलेली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) डॉ.प्रशात संजय राठोड यांच्या मृत्यू प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतू, त्यांचे वडील श्री.संजय तोळाराम राठोड यांनी तक्रार मागे घेतल्याबाबतचे शपथपत्र सादर केले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अधिष्ठाता, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांनी महाविद्यालय स्तरावर तीन ज्येष्ठ अध्यापकांची चौकशी समिती नेमली होती. सदर समितीने दिनांक २२/०४/२०१८ रोजी डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव येथे जाऊन प्रकरणाची सखोल चौकशी केली आणि संबंधित अधिष्ठाता यांच्यामार्फत चौकशी समिती

अहवाल सादर केला. त्यानुसार सदर गुन्हयातील फिर्यादी संजय तोळाराम राठोड यांनी दिलेली फिर्याद ही कॉलेज प्रशासनाविरुध्द गैरसमजुतीने दिली असल्याने त्यांनी नशिराबाद पोलीस स्टेशनला समक्ष हजर राहून जबाब दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरडशहापूर (ता.औढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(४१) ११४५६० (०६-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरडशहापूर (ता.औढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असतानाही प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कार्यान्वित झालेले नाही, हे खरे आहे काय
(२) असल्यास, येथील रुग्णांना आरोग्यसेवा देण्यासाठी शासनाने या केंद्राला आवश्यक साहित्य फर्निचर व कर्मचारी व वैदयकिय अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
औंढा नागनाथ तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र शिरडशहापूर येथील इमारतीचे बांधकाम अद्याप अपूर्ण असल्यामुळे इमारत ताब्यात घेतलेली नाही. तथापि, सद्य:स्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र शिरडशहापुरच्या परिसरामध्येच बांधलेल्या ४ खाटांच्या शासकिय इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात कार्यान्वित आहे.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता आवश्यक असलेल्या फर्निचर व साहित्य सामुग्रीकरीता जिल्हा नियोजन समितीमधून सन २०१८-१९ या वर्षात रु.१३.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र शिरडशहापूर येथे दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांसह १० पदे भरलेली आहेत व उर्वरित कर्मचाऱ्यांची ५ रिक्त पदे भरण्याबाबत ग्राम विकास विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांगी (ता.कडेगाव, जि. सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम सुरु करण्याबाबत**

**(४२) ११४७८६ (०९-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगी (ता.कडेगाव, जि. सांगली) येथील येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर असुन व कामाचा कार्यारंभ आदेश निघाला असल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र अदयाप काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन या केंद्राचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वांगी, ता.कडेगांव येथील जागा ताब्यात घेण्यात आली आहे. सदर जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचे नावे करणेत आलेली आहे.

---

**मौजे बावधन (जि.पुणे) या वनक्षेत्राच्या सिमाभिंतीचे कामात झालेला गैरव्यवहार**

**(४३) ११६७४९ (३०-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बावधान (जि.पुणे) येथील तत्कालीन वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांनी वनक्षेत्राची मोजणी न करता वन हद्दीच्या आत संरक्षक भिंत बांधल्याचे तसेच मौजे म्हाळुंगे येथील संरक्षक भिंत सलग न बांधता तुटकरित्या बांधल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन वनक्षेत्रपाल, भांबुर्डा यांच्यावर या प्रकरणी फक्त दोषारोपपत्र दखल करण्याव्यतिरिक्त कुठलीच कारवाई केली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१८) :** (१) मौजे बावधन, ता. मुळशी मधील सं.नं. २१ चे वनक्षेत्राची मोजणी केली असता, ३३० र.मी. लांबीची सिमाभिंत वन हद्दीच्या आत बांधल्याने सुमारे ०.३८ हे. इतके क्षेत्र सुटल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे मौजे म्हाळुंगे व बावधन येथील सीमाभिंत बांधताना लगतच्या खाजगी शेतकऱ्यांनी वनहद्द व खाजगी मालकीची हद्द यामध्ये वाद निर्माण करुन सिमाभिंत बांधण्यास मज्जाव केल्याने पुर्नमोजणी होईपर्यंत काही भाग सोडून तुटक सिंमाभिंत बांधल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र सदर सोडलेल्या भागाची मोजणी झाल्यानंतर सन २०१७-१८ मध्ये सदर वन जमीनीवर ५९०.र.मी. आरसीसी सिमा भिंत बांधण्यात आली आहे.

(२), (३) व (४) मौजे बावधन, ता. मुळशी येथील सिमाभिंत वन हद्दीच्या आत बांधल्याने सुमारे ०.३८ हे. इतके क्षेत्र सुटल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्रकरणी तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार कर्तव्यात कसूर केल्याबाबत विभागीय चौकशी सुरु करुन दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे. विभागीय चौकशीअंती संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईमधील परळ येथील नौरोजी वाडीया प्रसूतीगृहास ( मॅटरनिटी हॉस्पिटल) शासनाकडून देण्यात येणारे अनुदान थकीत असल्याबाबत**

**(४४) ११७०४५ (२३-०७-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील परळ येथील नौरोजी वाडीया प्रसूतीगृहास (मॅटरनिटी हॉस्पिटल) शासनाकडून देण्यात येणारे अनुदान सन २०१३-१४ पासून थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नौरोजी वाडीया प्रसूतीगृहाचे (मॅटरनिटी हॉस्पिटल) थकीत अनुदान तात्काळ अदा करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, व मा. वित्त्त व नियोजन मंत्री यांच्याकडे दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने थकीत अनुदान त्वरित वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) नौरोसजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पिटल, परळ, मुंबई या रुग्णालयाला सन २०१६-१७ च्या खर्चावर सन २०१७-१८ साठी दिनांक ३१ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये रुपये ३,६७,२२,९४०/- इतके सहायक अनुदान पहिला हप्ता म्हणून मंजूर करण्यात आले आहे, तसेच दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ च्या शासन निर्णयान्वये रुपये ४,२०,००,०००/-दुसरा हप्ता म्हणून मंजुर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

**राज्याच्या वनसंपदेत होत असलेली घट**

**(४५) ११८५१० (३०-०७-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे भौगोलिक क्षेत्र ७ लाख ७१३ चौरस किलो मीटर एवढे असुन त्यानुसार सन २००९ च्या सर्वेक्षणात वनक्षेत्र ५०६५० चौरस मीटर असतांना मागील ५ वर्षात राज्याच्या वनसंपदेत १४९ चौरस किलो मीटरची घट झाल्याबाबतची बाब माहे मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनक्षेत्र असणे आवश्यक असताना ही टक्केवारी २० झाली असून फक्त विदर्भाची आकडेवारी ४० टक्याच्यावर आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भ वगळता राज्याची वनक्षेत्राची टक्केवारी आणखी खाली येणार आहे, असा अहवाल डेहाराडूनच्या वनसर्वेक्षण संस्थेने दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या वनसंपदेची होत असलेली घट लक्षात घेता वनक्षेत्र वाढविण्याकरीता शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहे ,

(५) असल्यास, त्याचे स्वरूप काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-११-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०७७१३ चौ.कि.मी. एवढे असून फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाकडून भारतीय वन सर्व्हेक्षण अहवाल प्रसिद्ध करण्यात येतो. सन २००९ च्या अहवालात महाराष्ट्रात वनाच्छादित क्षेत्र ५०६५० चौ.कि.मी. इतके असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच त्यापुढील ५ वर्षातील वन अच्छादन स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

सन २००९ चा अहवाल- वन अच्छादन क्षेत्र- ५०६५० चौ.कि.मी.

सन २०११ चा अहवाल- वन अच्छादन क्षेत्र- ५०६४६ चौ.कि.मी. सन २०१३ चा अहवाल- वन अच्छादन क्षेत्र- ५०६३२ चौ.कि.मी.

सन २०१५ चा अहवाल- वन अच्छादन क्षेत्र- ५०६९९ चौ.कि.मी.

सन २०१७ चा अहवाल- वन अच्छादन क्षेत्र- ५०६८२ चौ.कि.मी.

वरील तपशीलावरुन महाराष्ट्रात सन २००९ च्या तुलनेत गेल्या ८ वर्षात ३२ चौ.कि.मी. एवढी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी २०.०१ टक्के वनाच्छादित असून त्यापैकी फक्त विदर्भाची आकडेवारी विचारात घेतल्यास वनाच्छदानाचे प्रमाण विदर्भातील एकूण भौगोलीक क्षेत्र ९७४०४ चौ.कि.मी. पैकी २६९०९ चौ.कि.मी. वनाच्छादित असून हे प्रमाण २०१७ च्या भारतीय वन सर्व्हेक्षण अहवालानुसार २७.६३ टक्के इतके आहे.

(३) अशाप्रकारचे अनुमान सदरच्या अहवालात नोंदविल्याचे दिसून येत नाही.

(४) सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये दरवर्षी जून - जुलै महिन्यात वृक्ष लागवड करुन एकूण ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट शासनाने ठेवले आहे.

(५) सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.सन उद्दीष्ट साध्य २०१७ ४ कोटी ५.४३ कोटी २०१८ १३ कोटी १५.८८ कोटी २०१९ ३३ कोटी

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खुल्या गटातील आर्थिक दुर्बल घटकांना राज्यातील सरकारी अथवा खासगी विनाअनुदानीत वैददयकीय व दंत वैददयकीय महाविद्यालयांतील शिक्षण शुल्कापैकी ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत**

**(४६) ११८९२८ (०१-०८-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुल्या गटातील आर्थिक दुर्बल घटकांना राज्यातील सरकारी अथवा खासगी विनाअनुदानीत वैद्यकीय व दंत वैद्यकीय महाविद्यालयांतील शिक्षण शुल्कापैकी ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती येत्या शैक्षणिक वर्षापासून करण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला असून याकरिता उत्पन्न सहा लाख रुपये असणार असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय ?

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीष महाजन (१९-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१८ अन्वये राज्यातील शासकीय/शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील रुपये २.५० लाख ते रुपये ६.०० लाख या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादेतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील एम.बी.बी.एस आणि बी.डी.एस अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञानाच्या इतर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत त्यांच्या शिक्षण शुल्काच्या रकमेची ५० टक्के शिष्यवृत्ती अदा करण्यास सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता दिली आहे.तसेच, शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१८ अन्वये उक्त उत्पन्नाची मर्यादा ही रुपये ८.०० लाख इतकी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील बा-हाळी सह इतर अनेक गावात परिसरात जलयुक्त शिवार योजनेतील कामे अद्यापपर्यंत सुरु झालेली नसल्याबाबत**

**(४७) १२०२६४ (२३-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील बा-हाळी सह इतर अनेक गावात प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे अदयाप जलयुक्त शिवार योजनेतील कामे सुरु झालेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी सिंचन सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, या परिसरात जलयुक्त शिवारची कामे तातडीने सुरु करण्यासह या योजनेची कामे सुरु करण्यास दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिटरगाव व जवळा (जि.लातूर) येथिल प्राथमिक आरोय केंद्रात रुग्णाची होत असलेली गैरसोय.**

**(४८) १२१३६८ (२८-०७-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिटरगाव व जवळा (जि.लातूर) येथिल प्राथमिक आरोय केंद्रात अधिकारी व कर्मचारी यांच्या रिक्त पदांमुळे तसेच तेथे सोयी- सुविधांचा अभाव असल्यामुळे रुग्णंना सेवा व उपचार तत्परतेने मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोय केंद्रातातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत व आरोग्य सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतिनिधीनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे माहे, मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे ,हे खरे आहे काय,
(३) असल्यास ,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत व आरोग्य सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

बिटरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरली असून कर्मचाऱ्यांच्या १९ पदांपैकी १४ पदे भरली आहेत. त्याचप्रमाणे जवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची दोन्ही पदे भरली असून कर्मचाऱ्यांच्या १८ पदांपैकी १४ पदे भरली आहेत. यांच्याकडून रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) हे खरे आहे.

सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरणेबाबत लातूर ग्रामीण लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र बंद असल्याबाबत

**(४९) १२१९५४ (२८-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र एक वर्षापासून बंद असल्याची बाब माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे उपकरण बंद असल्यामुळे कोडोली सह ५१ गावांना वैद्यकीय सुविधेसाठी तीस ते पन्नास कि.मी. दूर जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय

(४) असल्यास, त्यानुसार या रुग्णालयातले क्ष-किरण यंत्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, कोडोली येथील क्ष-किरण यंत्र सुरु असून, जानेवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीत एकूण ६२४ क्ष-किरण चाचण्या करण्यात आलेल्या आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे निमगाव सिन्नर (ता. सिन्नर, जि.नाशिक) येथील**
**बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५०) १२३१२० (२३-०७-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निमगाव सिन्नर, (ता. सिन्नर, जि.नाशिक) येथे सुरु असलेले के. टी. वेअर बंधारा दुरुस्तीचे काम निकृष्ट झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर के. टी. वेअर बंधारा-यांच्या निकृष्ट कामाची चौकशी करुन काम अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्राम पंचायत, निमगाव (सिन्नर) यांनी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, नाशिक यांचेकडे दि. ०१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, निमगाव सिन्नर येथील के.टी.बंधा-याचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (२०-११-२०१८) :** (१), (२), (३) व (४) यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधी यांचे निवेदन व त्यासोबत सरपंच, ग्रामपंचायत, निमगाव सिन्नर यांनी लोकप्रतिनिधींना उद्देशून लिहीलेले पत्र कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नाशिक कार्यालयास प्राप्त आहे.

प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने राज्य गुणवत्ता नियंत्रक यांना प्रस्तुत सिमेंट नाला बांधाची पाहणी करून बंधाऱ्याच्या कामाचा गुणवत्तादर्शक अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. राज्य गुणवत्ता नियंत्रक यांचेकडील अहवालानूसार तसेच संधानकाचे संपीडन सामर्थ्याच्या संदर्भातील प्रयोगशाळेतील प्राप्त निष्कर्षानूसार सदरील बंधाऱ्याचे संधानकातील दुरूस्तीचे काम गुणवत्तापूर्वक झालेले आहे. तसेच सदर काम निविदा विनिर्देशांनूसार पूर्ण करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.